**साखर कारखान्यांना सहवीज निर्मिती प्रकल्पासाठी ३ टक्के ऊस खरेदी करात सूट देणे.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग,**
**शासन पूरकपत्र क्र. अपाऊ-२०१०/प्र.क्र.३६०/ऊर्जा ७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,**
**दिनांक :- ३ मार्च, २०११.**

वाचा:- १) शासन निर्णय क्रमांक : अपाऊ२००७/प्र.क्र.६९३/ऊर्जा-७, दिनांक १४.१०.२००८ ( धोरण)
२) शासन निर्णय क्रमांक : अपाऊ २००७/प्र.क्र.६९३/ऊर्जा-७, दिनांक १४.१०.२००८ (आर्थिक भार)
३) शासन निर्णय क्रमांक : अपाऊ २००७/प्र.क्र.६९३-अ/ऊर्जा-७, दिनांक २७.१.२००९
४) शासन निर्णय क्रमांक : अपाऊ २००९/प्र.क्र.१५२८/ऊर्जा-७, दिनांक ३.८.२००९
५) शासन निर्णय क्रमांक : पवन-२०१०/प्र.क्र.१३४/ऊर्जा-७, दिनांक १४.७.२०१०.

**<u>प्रस्तावना</u> :-** सहकारी साखर कारखान्यांनी सहवीज/ वीज निर्मिती प्रकल्प आस्थापित केल्यास गाळपासाठी येणाऱ्या ऊस खरेदी करावरील ३ टक्के करातून १०० टक्के सूट पुढील १० वर्षांसाठी आर्थिक वर्ष २००६-०७ पासून लागू करण्यात आलेली आहे. खाजगी साखर कारखान्यांना सदर सूट लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार तसेच वित्त विभागाच्या सल्ल्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

**शासन पूरकपत्र** :- शासन निर्णय क्रमांक : अपाऊ-२००७/प्र.क्र.६९३/ऊर्जा-७, दिनांक १४ ऑक्टोबर, २००८ आणि शासन निर्णय क्रमांक : अपाऊ-२००७/प्र.क्र.६९३-अ/ऊर्जा-७, दिनांक २७ जानेवारी, २००९ मधील तरतूदीच्या अधीन राहून, BOOT तत्वावरील सहवीज प्रकल्प आस्थापित करणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांना, सहवीज प्रकल्प आस्थापित करणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांना व

RDTA/IT-3384 (1,500-03-011) I
MEDA-PUNE
09 MAR 2011
No. 2546

सहवीज प्रकल्प आस्थापित करणाऱ्या खाजगी साखर कारखान्यांना, ऊसाच्या खरेदीवर ३ टक्के करातून १०० टक्के सूट देण्यात येत असून सदर सूट खालील अटींच्या अधिनतेने देण्यात येत आहे:-

१) ऊस खरेदी करातून द्यावयाची सूट ही केवळ महावितरण कंपनीशी वीज खरेदी करार करुन त्याप्रमाणे प्रत्यक्षात वीज पुरवठा करणाऱ्या साखर कारखान्यांनाच मिळू शकेल.अन्य आस्थापनांना, अतिरिक्त वीज उपलब्ध करुन देणाऱ्या कारखान्यांना ही सूट अनुज्ञेय होणार नाही.

२) वरीलप्रमाणे वीज खरेदी करार करुन महावितरण कंपनीस अतिरिक्त वीज उपलब्ध करुन देतांना ही अतिरिक्त पारेषित वीज ६ मे.वॅट (१.८५ कोटी युनिट) वा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक राहील.

३) सन २००६-०७ पासून कार्यान्वित केलेल्या प्रकल्पांच्या बाबतीत कार्यपध्दती विहित केल्यापासून ( दिनांक १४ जुलै,२०१० पासून ) तसेच नव्याने आस्थापित होणाऱ्या प्रकल्पांसाठी प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून सदर सूट देण्यात यावी.

यान्वदारा सूट म्हणून मिळालेल्या लाभाची रक्कम, सहवीज निर्मिती प्रकल्पाच्या एकूण भांडवली गुंतवणूकीइतकी होईपर्यंत अथवा १० वर्षाचा कालावधी पूर्ण होईपर्यंत यापैकी प्रथम होणाऱ्या घटनेपर्यंत चालू राहील.

४) सहवीज/ वीज निर्मिती प्रकल्पाचा प्लॅन्ट लोड फॅक्टर(PLF) राज्य विद्युत नियामक आयोगाने जाहिर केलेल्या वीज दर आदेश दिनांक १४ जुलै,२०१० मध्ये निर्देशित केल्यानुसार असावा. याप्रमाणे प्रकल्प चालविल्यानंतरच सदर ऊस खरेदी करातून सूट अनुज्ञेय होईल. याशिवाय त्या वर्षाकरिता प्रकल्पाची टॉपिंग सायकल कार्यक्षमता (Topping Cycle efficiency) ४५ टक्के वा त्यापेक्षा अधिक असणाऱ्या प्रकल्पांना ही सूट अनुज्ञेय होईल.

५) या योजनेंतर्गत लाभ घेण्याकरिता संबंधित साखर कारखान्यांना पात्रता प्रमाणपत्र मिळण्याच्या तारखेपर्यंत ऊस खरेदी कर कायद्यांतर्गत असलेली सर्व थकबाकी भरणे आवश्यक आहे.

६) संबंधित वर्षातील हंगामात वरीलप्रमाणे अतिरिक्त वीज पारेषीत केल्याचे राज्य भार पुरवठा केंद्र (SLDC) यांचेकडून आणि १०० टक्के वीज महावितरणास पुरविली गेली असल्याबाबतचे महावितरण कंपनीकडून प्रमाणित करुन घेऊन महाऊर्जाकडे सादर करावे.

७) उपरोक्त नमूद केल्यानुसार आवश्यक बाबींची तपासणी करुन प्रत्येक वर्षी महाऊर्जाचे पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate ) घेणे आवश्यक राहील.

८) प्रस्तुत योजनेंतर्गत कार्यान्वित कालावधी हा पात्रता प्रमाणपत्र/ अनुज्ञेयता प्रमाणपत्रातील पात्र कालावधी



H-3384-125

संपल्यानंतर पाच वर्षापर्यंत असेल.एखाद्या सहकारी साखर कारखान्याने सदर कार्यान्वित कालावधी पूर्ण होण्याच्या अगोदर वीज प्रकल्प बंद केल्यास बंद केलेल्या तारखेपर्यंत उपभोगलेल्या संपूर्ण सूटीची रक्कम वार्षिक १२ टक्के व्याजासह त्वरित एकरकमी भरावी लागेल.

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या १) अनौपचारिक संदर्भ क्रमांक :१०६०/व्यय-१६/१० दिनांक १.१०.२०१० व २) अनौपचारिक संदर्भ क्रमांक १५/१० /करा-३, दिनांक २२.११.२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक :२०११०३०४१४४६२१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

स्मि.श.रानडे

( स्मि.श.रानडे)
शासनाच्या उपसचिव

प्रति,

- सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई ( पत्राने )
- महासंचालक,महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण ,पुणे
- प्रधान सचिव, मुख्यमंत्र्याचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
- मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
- उपमुख्यमंत्री/ सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
- सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन,मुंबई.
- अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव यांचे स्वीय सहाय्यक, सर्व मंत्रालयीन विभाग.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधार कंपनी गर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत , निर्मिती कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., मुंबई.
- खाजगी सचिव, मा.मंत्री, (ऊर्जा)
- खाजगी सचिव, मा.मंत्री, अपारंपरिक ऊर्जा.
- सर्व परवानाधारक कंपन्या
- ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने/ निवडनस्ती-ऊर्जा-७

F:\g.r.360--24-2-11.doc

ਮ-3384- 2